खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – ०१/१०/२०१७

प्रेसनोट

---

**वाहन चो-या व मोपेडची डिकी उघडुन चोरी करणारा सराईताकडुन सव्वा लाखाचा माल हस्तगत नऊ गुन्हे उघड**

---

दिनांक – २८/०९/२०१७ रोजी खडक पोलीस स्टेशन पुणे येथील तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी नवरात्र उत्सवाच्या अनुषंगाने हददीमध्ये गस्त घालत असताना पोलीस नाईक अनिकेत बाबर यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की पुणे शहरामध्ये वेगवेगळया भागात दुचाकी मोपेड डिकी उघडुन चो-या करणारा सराईत गुन्हेगार हर्षल पिसाळ हा नातुबाग बाफना पेट्रोलपंप येथे चालु असलेल्या दांडियाचे कार्यक्रमाचे ठिकाणी संशयीतरित्या फिरत आहे अशी बातमी मिळाल्यावरुन त्याठिकाणी सापळा रचुन संशयीत इसम हर्षल राजाराम पिसाळ वय – ४३ रा – ६४९/अे/६ शिवतेज नगर बकुळ हॉलजवळ बिबवेवाडी पुणे यास पकडण्यात आलेले आहे.

आरोपीस विश्वासात घेवुन बारकाईने सखोल तपास केला असता त्याने पुणे शहरात वेगवेगळया ठिकाणी पार्क करण्यात आलेल्या टिव्हिएस विगो, ज्युपिटर, स्कुटी पेप या गाडयांच्या डिकी उघडुन त्यामध्ये ठेवलेल्या पर्समधील रोख रक्कम, मोबाईल फोन तसेच दुचाकी वाहने चोरल्याची माहीती पोलीसांना दिलेली आहे. त्याचे ताब्यातुन तीन दुचाकी वाहने, मोबाईल फोन, रोख एकवीस हजार रुपये असा एकुण एक लाख एकवीस हजार रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. **अशाप्रकारे त्याने पुणे शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी पार्क करण्यात आलेल्या ॲक्टीव्हा, ज्युपिटर, ॲक्सीस, वेगो सारख्या चोवीसपेक्षा जास्त मोपेडच्या डिकी उघडुन त्यामधील ऐवज चोरी केल्याची माहीती पोलीसांना दिलेली आहे. त्यापैकी खडक पोलीस स्टेशनच्या हददीत दोन, विश्रामबाग पोलीस स्टेशनच्या हददीत दोन, सहकार नगर पोलीस स्टेशनच्या हददीत दोन, बिबवेवाडी, फरासखाना च्या हददीत प्रत्येकी एक असे एकुण नऊ गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहे.**

श्री शुभम नवनाथ शेंडकर वय – २३ रा – ३६६ मंगळवार पेठ खेसे बारणे टॉवर पुणे मुळ गाव पारनेर जिल्हा अहमदनगर हे दिनांक - १२/०६/२०१७ रोजी सकाळी ०५/१५ वा चे सुमारास शुक्रवार पेठ रेणुकामाता मंदिरसमोर पार्क पुणे येथे त्यांचे आयटेन या गाडीच्या काचा उघडया ठेवुन गाडीमध्ये झोपले असताना त्यांचा डॅशबोर्डवर ठेवलेला मोबाईल फोन चोरीस गेला होता त्याबाबत त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे सदर गुन्हा आरोपी याने केल्याचे उघडकीस आलेले आहे.

**आरोपीविरुध्द यापुर्वी डेक्कन पोलीस स्टेशन पुणे येथे दहा, स्वारगेट येथे पाच , सहकारनगर येथे तीन, येरवडा येथे दोन फरासखाना, विश्रामबाग, कोथरुड येथे प्रत्येकी एक असे एकुण तेवीस गुन्हे दाखल आहेत. तो डिकीमधील पर्स चोरल्यानंतर त्यातील फक्त रोख रक्कम काढुन घेवुन उर्वरित माल फेकुन देत होता. तो सज्जन चोर या नावाने ओळखला जातो. अशाप्रकारे त्याने आणखी कोठे गुन्हे केले आहेत ? त्याचे आणखी साथीदार आहेत का ? याबाबत पोलीस तपास करत आहेत.**

मा. श्रीमती अे. अेस. मुजुमदार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपीस हजर केले असता त्यास दिनांक - ०३/१०/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीते यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, अनंता व्यवहारे व तपास पथकातील पोलीस कर्मचारी विजय कांबळे, गणेश माळी, इम्रान नदाफ, अनिकेत बाबर, अशिष चव्हाण, राकेश क्षीरसागर, गणेश सातपुते यांनी केलेली आहे.